RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष १, अंक ८१(२)] शुक्रवार, ऑक्टोबर १६, २०१५/आश्विन २४, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक १७९

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ ऑक्टोबर २०१५

**अधिसूचना**

**मोटार वाहन अधिनियम, १९८८.**

क्रमांक एमव्हीआर-११११/प्र.क्र. ८६५/पु.बां.७२/परि-२.—मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) याचे कलम १३८, पोट-कलम (२) खंड (जे) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम योजिले आहे. याद्वारे उक्त अधिनियमांच्या कलम २१२ च्या पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वीच प्रसिद्ध करण्यात आलेले पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र मोटार वाहन (सुधारणा) नियम, २०१५ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ यांच्या नियम २१ मधील, उप-नियम (१८) मध्ये जेथे " खाकी " हा मजकूर आला असेल तेथे तेथे " पांढरा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**गौतम चॅटर्जी,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**परिवहन आयुक्त कार्यालय,**
५ वा मजला, फाऊंटन टेलिकॉम बिल्डिंग क्र.२,
हुतात्मा स्मारक चौक, एम.जी. रोड, मुंबई-४००००१

Email – dycommr.enf1@gmail.com

**क्रमांक - एमव्हीआर-०१०१/सीआर-०१/का.२(२)/जा.क्र.** 15048 **दिनांक :-** 10 DEC 2025

**प्रति,**
सरचिटणीस,
मुंबई रिक्षामेन्स युनियन,
बी-१०/३, गोकुळ वैशाली बिल्डींग, वैशालीनगर,
जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई ४००१०२.

**विषय :-** महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ नियम २१(१८) मधील सुधारणेबाबत.

**संदर्भ -** आपले पत्र दि.०७.११.२०२५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, आपण ऑटोरिक्षा चालक मालक यांना अधिकृत व अपेक्षित गणवेश कोणता असावा याबाबत या कार्यालयाकडे संदर्भिय पत्रान्वये निवेदन सादर केले आहे.

आपणांस कळविण्यात येते की, शासन अधिसूचना क्र.एमव्हीआर-१११९/प्र.क्र.८६५/पु.बां.७२/परि-२, दि.१६.१०.२०१५ अन्वये, अधिसूचनद्वारे महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ नियम २१(१८) मध्ये सुधारणा करण्यात येऊन, जेथे 'खाकी' मजकूर होता तेथे 'पांढरा' हा मजकूर दाखल करण्यात आलेला आहे. (प्रत संलग्न)

सोबत - वरीलप्रमाणे

**(संदेश चव्हाण)**
**सह परिवहन आयुक्त (अंमल-१)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रत -**

१. सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.
२. सह परिवहन आयुक्त (संगणक), महाराष्ट्र राज्य यांना सदर शासन अधिसूचनेची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यासाठी.